**पुष्प – ८ : अधिष्ठान ग्रंथ**

**हे गीता नाम विख्यात**

१. असा कर्मप्रधान भागवतधर्म अर्जुनाला सांगितला भगवान श्रीकृष्णांनी.

२. श्रीमद्‌भगवद्‌गीतेची जन्मकथा : व्यासांचे उपकार.

३. जगण्याची कला शिकवणारे ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचले पाहिजे ही व्यासांची तळमळ.

४. बोलणे आणि लिहिणे या दोन्ही गोष्टी आवश्यक व महत्त्वाच्या : गणपती बनले व्यासांचे लेखक.

*************************************************

**संतबोल**

- भानुचेनि तेजें धवळलें। जैसें त्रैलोक्य दिसे उजळलें। तैसें व्यासमती कवळलें। मिरवे विश्व।। (ज्ञा. १.३९)
- ना तरी शब्दब्रह्माब्धि। कथियेला व्यासबुद्धि। निवडलें निरवधि। नवनीत हें।। (ज्ञा. १.५१)
- हा वेदार्थसागरू। जया निद्रिताचा घोरू। तो स्वयें सर्वेश्वरू। प्रत्यक्ष अनुवादला।। (ज्ञा. १.७२)
- एवं वेदाचें मूळसूत्र। सर्वाधिकारैक पवित्र। श्रीकृष्णें गीताशास्त्र। प्रकट केलें।। (ज्ञा. १८.१४२६)
- म्हणौनि व्यासाचा हा थोरू। विश्वासि जाला उपकारू। श्रीकृष्णउक्ती आकारू। ग्रंथाचा केला।। (ज्ञा. १८.१७०७)

**मंजिरी – ८**

८.१ अर्जुनालाचा गीता सांगण्याचे कारण : अर्जुन ऋजू मनाचा म्हणून.

८.२ गीता आणि उपनिषदे.

८.३ ‘उपनिषद’ या शब्दाचा अर्थ.

८.४ वेद हा परमेश्वराचा नि:श्वास तर गीता हे प्रत्यक्ष त्याच्या मुखाद्वारे घडलेले कथन.

८.५ गोरक्षनाथ–गहिनीनाथ–निवृत्तिनाथ–ज्ञानदेव.

८.६ गीताख्यानाचे निर्मितीकारण.

**************************************************

**संतबोल**

- अहो अर्जुनाचिये पांती। परिसणया योग्य होती। तिहीं कृपा करूनि संतीं। अवधान द्यावें।। (ज्ञा. १.६२)
- अर्जुना संकट पडतां जडभारीं। श्रीमद्भगवद्गीता सांगे हरी कुरूक्षेत्रीं।। (श्रीनाथराय)
- माझा मऱ्हाटाचि बोलु कौतुकें। परि अमृतातेंही पैजांसीं जिंके। ऐसी अक्षरें रसिकें। मेळवीन।। (ज्ञा. ६.१४)
- संस्कृत वाणी देवें केली। तरी प्राकृत काय चोरापासोनि जाली।
  असोतु या अभिमानभुली। वृथा बोलीं काय काज।। (ए.भा. १.२९)
- मग आर्ताचेनि वोरसे। गीतार्थ ग्रंथन मिसें। वर्षला शांतरसें। तो हा ग्रंथु।। (ज्ञा. १८.१७६१)
- एवं गुरुक्रमें लाधलें। समाधिधन जें आपुलें। तें ग्रंथें बांधौनि दिधलें । गोसावी मज।। (ज्ञा. १८.१७६३)